नाशिक महानगरपालिका , नाशिक

राजीव गांधी भवन, शरणपूररोड, नाशिक

विधी विभाग

जाहिरात

नाशिक महानगरपालिका, विधी विभागात विविध न्यायाधिकरणांकरिता विशेष मनपा पॅनल तयार करावयाचे आहे. अर्हता धारक उमेदवारांनी www.nmc.gov.in या संकेतस्थळावर अर्ज, जाहिरात इत्यादी तपशीला करीता भेट द्यावी व दिनांक -२४/०७/२०२३ पावेतो अर्ज करावेत. केवळ जाहिरातीत नमूद विविध न्यायाधिकरणात काम केलेल्या विधिज्ञांनीच अर्ज करावा.

आयुक्त तथा प्रशासक

नाशिक महानगरपालिका नाशिक

## नाशिक महानगरपालिका, नाशिक

## विशेष वकील पॅनल नियुक्ती करीता जाहिरात

नाशिक महानगरपालिकेच्या वतीने व विरुद्ध दाखल होणाऱ्या खालील तक्त्यात नमूद न्यायाधिकरणांमध्ये प्रामुख्याने कार्यरत असलेल्या विशेष विधिज्ञाची सन २०२३ ते २०२८ या कालावधीसाठी नियुक्ती करणेकरिता विहित ऑफलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| १) | अपील न्यायाधिकरण (Appellate Tribunal) |
| २) | केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण (Central Administrative Tribunal) |
| ३) | सिक्युरिटीज अपील न्यायाधिकरण (Securities Appellate Tribunal) |
| ४) | कर्ज वसुली अपील न्यायाधिकरण (Debts Recovery Appellate Tribunal) |
| ५) | दूरसंचार विवाद निपटारा आणि अपील न्यायाधिकरण (Telecom Disputes Settlement and Appellate Tribunal) |
| ६) | राष्ट्रीय कंपनी कायदा अपील न्यायाधिकरण (National Company Law Appellate Tribunal) |
| ७) | राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोग (National Consumer Disputes Redressal Commission |
| ८) | सर्वोच्च न्यायालय वीज अपीलीय न्यायाधिकरण (Appellate Tribunal for Electricity) |
| ९) | राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण (National Green Tribunal) |
| १०) | राष्ट्रीय मानव अधिकार आयोग (National Human Rights Commission of India) |
| ११) | धर्मदाय आयुक्त |
| १२) | भूमी अभिलेख, औरंगाबाद / नागपूर/ नाशिक |
| १३) | वक्फ बोर्ड |
| १४) | लवाद न्यायाधिकरण (Arbitration Tribunal) |

प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत.

१) **शैक्षणिक अर्हता आणि अनुभव** -उमेदवाराने विधी शाखेची पदवी धारण केलेली असावी.
२) **प्राधान्यशील अर्हता** - विधी शाखेत पदव्युतुर परीक्षा एल. एल. एम. (LLM )पदवी धारक असावा.
३) **वयोमर्यादा** - किमान ३५ वर्ष कमाल ५० वर्ष
४) विधीज्ञांचे / वकिलांचे स्वतःचे कार्यालय, दूरध्वनी व सहाय्यक कर्मचारी यासह अद्यावत असले पाहिजे. उमेदवारास कमीत कमी १५ वर्षे वरील तक्त्यात नमूद केलेल्या न्यायाधिकरणामध्ये किंवा यापैकी जास्तीत जास्त न्यायाधिकरणामध्ये कामकाज केल्याचा अनुभव असणे अनिवार्य आहे.
५) **सोबत दाखल करावयाचे दस्तऐवज** -आपण कामकाज केलेल्या प्रत्येक वर्षाचे किमान १ ते २ न्यायनिवाडे व वकीलपत्र यांची प्रमाणित प्रत ,सनद प्रत ,आधार कार्ड ,पॅन कार्ड ,शैक्षणिक प्रमाणपत्र **इ.**
६) **उपलब्ध पद संख्या** -०३
७) अटी - शर्ती मध्ये पूर्णतः बदल करणे इत्यादी बाबतचे सर्व अधिकार आयुक्त यांचेकडे राखीव असतील.

**आयुक्त तथा प्रशासक**
**नाशिक महानगरपालिका नाशिक**

# अर्जाचा नमुना

१)अर्जदाराचे संपूर्ण नाव -

| अर्जदाराचे संपूर्ण नाव | आडनाव | नाव | वडिलांचे / पतीचे नाव |
|---|---|---|---|
| मराठी | | | |
| इंग्रजी | | | |

२) पत्र व्यवहाराचा संपूर्ण पत्ता -________________________________________

________________________________________

३) दूरध्वनी क्रमांक/ मोबाईल नंबर -________________________________________

४) जन्म तारीख (अंकात व अक्षरात)-________________________________________

५) जाहिरातीचे दिनांकास वय - वर्ष ____________महिने____________ दिवस ____________

६) लिंग - पुरुष / महिला / इतर

७) अवगत असलेल्या भाषा - मराठी /हिंदी / इंग्रजी

८) शैक्षणिक अर्हता-

| शिक्षण | शैक्षणिक संस्थचे नाव विद्यालय / महाविद्यालय | बोर्ड / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| पदवी | | | |
| पदव्युत्तर | | | |
| संगणकीय ज्ञान | | | |
| इतर | | | |

**९) अर्जदाराची इतर माहिती-**

अ) सनद घेतल्याचा दिनांक -________________

ब) उमेदवाराने अनुभवाचे प्रमाणपत्र जोडले आहे काय?   होय / नाही

क) उमेदवाराने खालील न्यायाधिकरणांमध्ये स्वतः हाताळलेल्या केसेसचा तपशील -(स्वतंत्र कागदावर नमूद करावा)

| अ. क्र. | न्यायाधिकरणांचे नाव | याचिकांचे / दाव्यांचे प्रकार | याचिका / दाव्यांची संख्या | होय/ नाही ✔/ ✘ |
|---|---|---|---|---|
| १) | अपील न्यायाधिकरण (Appellate Tribunal) | | | |
| २) | केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण (Central Administrative Tribunal) | | | |
| ३) | सिक्युरिटीज अपील न्यायाधिकरण (Securities Appellate Tribunal) | | | |
| ४) | कर्ज वसुली अपील न्यायाधिकरण (Debts | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Recovery Appellate Tribunal) | | | |
| ५) | दूरसंचार विवाद निपटारा आणि अपील न्यायाधिकरण (Telecom Disputes Settlement and Appellate Tribunal) | | | |
| ६) | राष्ट्रीय कंपनी कायदा अपील न्यायाधिकरण (National Company Law Appellate Tribunal) | | | |
| ७) | राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोग (National Consumer Disputes Redressal Commission) | | | |
| ८) | सर्वोच्च न्यायालय वीज अपीलीय न्यायाधिकरण (Appellate Tribunal for Electricity) | | | |
| ९) | राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण (National Green Tribunal) | | | |
| १०) | राष्ट्रीय मानव अधिकार आयोग (National Human Rights Commission of India) | | | |
| ११) | धर्मदाय आयुक्त | | | |
| १२) | भूमी अभिलेख, औरंगाबाद / नागपूर/ नाशिक | | | |
| १३) | वक्फ बोर्ड | | | |
| १४) | लवाद न्यायाधिकरण (Arbitration Tribunal) | | | |

१०) अर्जदाराविरुद्ध यापूर्वी कोणताही दखलपात्र गुन्हा दाखल आहे का? होय / नाही.

## अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी श्री./ सौ./ कु. ______________________________ या द्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो /करते की, वरील माहिती जाणिवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिले असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक अर्हतानुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी माझी राहील व त्या बाबतीत माझ्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाहीस मी पात्र राहील तसेच नियुक्ती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेल.

सोबत - अर्जात नमूद केलेल्या प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती जोडल्या आहेत.

ठिकाण- अर्जदाराची स्वाक्षरी

दिनांक - अर्जदाराचे नाव-______________________

## अटी व शर्ती

१. सदर न्यायाधिकरणाकरिता नियुक्त वकीलांकरिता कामकाज चालविणेकामी फी मध्ये अनुषंगीक खर्च म्हणजेच टायपिंग झेरॉक्स कोर्ट फी स्टॅम्प, निकाल पत्राच्या दोन प्रती व प्रोसेस फी इ. अंतर्भूत असेल. अतिरिक्त फी ठरविणेबाबत मा. आयुक्त यांचे आदेशानुसार फी ठरविण्यात येईल.

२. नाशिक महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात वेळोवेळी आवश्यकतेनुसार न्यायालयीन कामकाजाबाबत आयोजित केलेल्या बैठकीस वकीलांनी उपस्थित रहावे.

३. नाशिक महानगरपालिकेच्या हिताचे विरुध्द कोणत्याही प्रकरणात / दाव्यात काम करता येणार नाही. तसे मनपास आढळून आल्यास आपली नियुक्ती रद्द समजण्यात यावी.

४. आपले कामकाज असमाधानकारक आल्यास आपली पॅनल वरील नियुक्ती मुदत पुर्व रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त सो. यांनी राखुन ठेवला आहे.

५. सर्व कामांकरीता वकिलांनी विविध नस्तीवर दिलेला अभिप्राय/ कायदेविषयक सल्ल्याबाबत देयक सादर करतेवेळी त्याबाबतचा सविस्तर तपशील दिल्यावरच देयक अदा केले जाईल.

६. दाव्याचा निकाल मनपा विरुध्द लागल्यास त्याबाबत त्वरीत संबधीत विभागास कळविण्याची जबाबदारी आपली राहील. तसेच या निकालां विरूध्द विभागाने अपिल करावे किंवा कसे याबाबत मार्गदर्शन करावे.

७. दाव्याच्या अंतिम निकालानंतर निकालाच्या प्रती बिला सोबत २ प्रतीत सादर केल्यानंतरच वकील फी अदा करणेत येईल.

८. मनाई हुकूम/दाव्याचे अंतिम निकालानंतर त्वरीत नकलेसाठी अर्ज देण्यात यावा व नक्कल प्राप्त झाल्यानंतर विनाविलंब मुख्यालयात पाठविण्यासाठी व्यवस्था करण्यात यावी.

९. दाव्याचे कामकाजामध्ये मनपा विधी विभागामार्फत मनपाच्या संबंधीत वकीलांना वकील पत्र,आलेल्या दाव्यांच्या प्रती पुरविणेत येईल.

१०. नाशिक महानगरपालिका वकील पॅनलचे कामकाजावर उप-आयुक्त अथवा समकक्ष खातेप्रमुख यांचे नियंत्रण राहील. याबाबत आवश्यक त्या सुचना वकील पत्र व आदेश देणेचे अधिकार त्यांना राहतील.

११. नाशिक महानगरपालिकेच्या ज्या विभागाशी केस निगडित असेल त्या खाते प्रमुख/विभाग प्रमुख यांचेशी भ्रमणध्वनी / दुरध्वनी / ई- मेल व्दारे संपर्क संबधित वकिलांनी ठेवावा व सदर दाव्याबाबत पुर्वसुचना संबधीत खाते प्रमुख/विभाग प्रमुख यांना दयाव्यात. प्रतिज्ञापत्र करते वेळी अधिकारी / कर्मचारी यांना सहकार्य करावे.

१२. दाव्याच्या तारखेबाबत वकिलांनी ज्या विभागाची केस निगडित असेल त्या विभागास वेळोवेळी कळवावे व आवश्यक ते कागदपत्रे मागवून घ्यावेत.

१३. नाशिक मनपा पॅनलवरील वकिलांनी एकमेकांत समन्वय ठेवावा.

१४. वर्ष संपल्यानंतर आपलेकडे वर्षाअखेर शिल्लक, त्या वर्षात वर्ग केलेले दावे, त्या वर्षात निकाली दावे, त्या वर्षात मनपा बाजूने व विरुध्द लागलेले निकाल, अशंत: निकाल व वर्षा अखेर शिल्लक दावे अशा प्रकारची एकत्रित माहिती प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्याच्या अखेर पर्यंत विनाविलंब विधी विभागात सादर करावी.

१५. दाव्यांच्या वाटपा बाबत व वकील पत्र देणे बाबत मा.आयुक्त सो. यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यास /खातेप्रमुखास अधिकार राहतील. तथापी याबाबतचे अंतिम अधिकार मा.आयुक्त सो. यांना राहतील.

१६. जर चुकून वकील फी जास्त अदा झाल्यास, जादा अदा झालेली आक्षेपित रक्कम त्वरीत भरणे अथवा पुढील बिलातुन वजा केली जाईल.

१७. वकील फी बाबत नियुक्ती नंतर वकील फी इ. बाबत आदेश देण्यात येतील.

- **अर्ज करण्याची पद्धत-**

१) मनपा विशेष पॅनल वकील पदासाठी करावयाचा अर्ज मा. आयुक्त तथा प्रशासक नाशिक महानगरपालिका , नाशिक राजीव गांधी भवन , शरणपूर रोड, नाशिक ४२२००२ यांचे कार्यालयात किंवा पोष्टाने दिनांक ०४/०७/२०२३ ते दिनांक २४/०७/२०२३ पर्यंत १०.०० ते १६.०० वाजेपर्यंत कार्यलयीन वेळेत सादर करावेत.

२) मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा स्वीकार करण्यात येणार नाहीत तसेच पोष्टाने दिनांक २४/०७/२०२३ पर्यंत १८.०० वाजेनंतर प्राप्त झालेल्या अर्जानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

३) अर्जाचा नमुना (nmc.gov.in) या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आलेला आहे. सदर अर्जाचा नमुना डाऊनलोड करून अर्ज परिपूर्णरित्या भरून सादर करावा. अपूर्ण असलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

४) **सोबत दाखल करावयाचे दस्तऐवज-** आपण कामकाज केलेल्या प्रत्येक वर्षाचे किमान १ ते २ न्यायनिवाडे व वकीलपत्र यांची प्रमाणित प्रत , सनद प्रत , आधार कार्ड , पॅन कार्ड , शैक्षणिक प्रमाणपत्र

आयुक्त तथा प्रशासक ,
नाशिक महानगरपालिका नाशिक

- **अर्ज करण्याची पद्धत-**

१) मनपा विशेष पॅनल वकील पदासाठी करावयाचा अर्ज मा. आयुक्त तथा प्रशासक नाशिक महानगरपालिका, नाशिक राजीव गांधी भवन , शरणपूर रोड, नाशिक ४२२००२ यांचे कार्यालयात किंवा पोष्टाने दिनांक ०४/०७/२०२३ ते दिनांक २४/०७/२०२३ पर्यंत १०.०० ते १६.०० वाजेपर्यंत कार्यलयीन वेळेत सादर करावेत.

२) मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा स्वीकार करण्यात येणार नाहीत तसेच पोष्टाने दिनांक २४/०७/२०२३ पर्यंत १८.०० वाजेनंतर प्राप्त झालेल्या अर्जानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यांत येणार नाही.

३) अर्जाचा नमुना **(nmc.gov.in)** या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आलेला आहे. सदर अर्जाचा नमुना डाऊनलोड करून अर्ज परिपूर्णरित्या भरून सादर करावा. अपूर्ण असलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

४) **सोबत दाखल करावयाचे दस्तऐवज-** आपण कामकाज केलेल्या प्रत्येक वर्षाचे किमान १ ते २ न्यायनिवाडे व वकीलपत्र यांची प्रमाणित प्रत , सनद प्रत , आधार कार्ड , पॅन कार्ड , शैक्षणिक प्रमाणपत्र

**आयुक्त तथा प्रशासक .**
**नाशिक महानगरपालिका नाशिक**